राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक - रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.-०१/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक - १७ जानेवारी, २०१२.

## परिपत्रक

एखादा उमेदवार मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे अथवा नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केलेला आहे किंवा कसे याकरिता संबंधित उमेदवाराने जिल्हा परिषदेकरिता महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक विभाग व निवडणुका घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेला नमुना दोन-अ व दोन-ब आणि पंचायत समितीकरिता महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणुका घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेला नमुना दोन-अ व दोन-ब संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे कोणत्या वेळेपर्यंत सादर करावा याबाबत जिल्हाधिकारी तसेच विविध राजकीय पक्षांकडून राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा होत असते. **याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसंबंधात नमुना दोन-अ व दोन-ब उमेदवारी मागे घेण्याच्या दिनांकास दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.**

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,